**वादी तर्फे सा.क्र.१ चा अतिरिक्त सरतपास – श्री. डी. डी. आजगेकर वकील.**

**१०.** आता मला माझ्या पतीने करुन दिलेले मूळ वटमुखत्यारपत्र दाखवले. त्याला **नि. क्र.८९** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादीं तर्फे उलट तपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

**११.** माझे शिक्षण झालेले नसल्यामुळे मला लिहिता-वाचता येत नाही. माझे पती आमच्या लग्नापुर्वी पासून मुंबईला नोकरीला होते. माझे पती लग्नापूर्वी हॉटेलमध्ये नोकरी करत होते, त्यानंतर ते हसमुख कंपनीमध्ये नोकरीला लागले होते. माझे पती मुंबईला राहून नोकरी करत होते, पाच-सहा वर्षांपूर्वी ते गावी आले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ते गावी आल्यापासून शेती करत आहेत.

**प्रश्न** – तुमचे पती गावात हिंडत-फिरत असून आजरा, गडहिंग्लज येथे बाजारासाठी येत असतात ?

**उत्तर** – माझे पती एकटे हालचाल करु शकत नसल्यामुळे इतरांसोबत त्यांना पाठवावे लागते.

**१२.** माझ्या पतीला उच्च रक्तदाब व मधुमेहाचा आजार आहे. सदर बाब वटमुखत्यारपत्रा मध्ये नमूद केलेली नाही. माझे वटमुखत्यारपत्र गडहिंग्लज येथील पाटील वकिलांनी लिहिले आहे, मला त्यांचे पुर्ण नाव व त्यांचे कार्यालय कोठे आहे याबाबत सांगता येणार नाही. मला सदर वटमुखत्यारपत्र कोणत्या तारखेला केले याबाबत सांगता येत नाही.

**प्रश्न** – तुमचे वटमुखत्यारपत्र हाताने लिहिले आहे की टंकलिखित केले आहे ?

**उत्तर** – माझे वटमुखत्यारपत्र टंकलिखित केले असावे.

**१३.** मला ते कोणी टंकलिखित केले त्याचे नाव सांगता येणार नाही. मी वटमुखत्यारपत्र केले तो संपुर्ण दिवस गडहिंग्लज येथे गेला. मी व माझ्या पतीने असे दोघांनी वटमुखत्यारपत्र करुन घेतले आहे. त्यावरती गडहिंग्लज येथील चार-पाच लोकांच्या स्वाक्ष-या असून मला त्यांची नावे सांगता येणार नाहीत. मी त्यांना आता ओळखू शकत नाही. आम्ही वटमुखत्यारपत्र करताना उतारा व फोटो दिले होते. आम्ही वटमुखत्यारपत्र केले त्यावेळी यमेकोंड येथे राहत होतो व आजदेखील तेथेच राहत आहोत.

**१४**. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती स्वतः न्यायालयात हजर राहून जबाब देऊ शकतात. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती न्यायालयात खरे सांगतील या भीतीने मी त्यांचे खोटे वटमुखत्यारपत्र घेतले आहे. मला दावा मिळकतीचा पुर्वीचा सर्वे क्रमांक सांगता येणार नाही. मी दावा मिळकतीचा नकाशा पाहिलेला नाही.

**१५**. मला माझ्या पतीला तातोबा कातकर यांनी दत्तक घेतल्याची माहिती आहे. मी त्या दत्तकपत्राला हजर नव्हते. मी माझ्या पतीच्या दत्तकपत्रा बाबत साक्षीदार उपलब्ध असल्यास त्यांचा पुरावा घेणार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पती तातोबा कातकरचे दत्तकपुत्र असल्याचे खोटे सांगत आहे.

**१६**. माझ्या पतीने पुर्वी प्रतिवादीं विरोधात नि. दि. दा. क्र.११९/१९८७ दाखल केलेल्या दाव्यामध्ये स्वतः हजर राहून पुरावा दिला नव्हता. त्या दाव्यामध्ये माझ्या पतीच्या वतीने धोंडिबा दिवटे यांनी साक्ष दिली होती. माझे पती हे धोंडिबा दिवटेचा जनक मुलगा आहे. हे म्हणणे खरे नाही की, धोंडिबा दिवटे माझ्या पतीमार्फत प्रतिवादींना त्रास देण्यासाठी दावे दाखल करत आहे. त्या दाव्याचे मा. उच्च न्यायलय, मुंबई पर्यंतचे सर्व निकाल प्रतिवादींच्या बाजूने झाले आहेत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**१७**. गट क्र.३१ ची जमीन सरकारी पडीची असून प्रतिवादींना मिळालेली आहे. दावा मिळकत त्यांच्या सदर जमिनीला लागून आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा पुर्वीचा सर्वे क्र.१३०/४ आहे. मला दावा मिळकतीचा सर्वे क्रमांक माहिती नसल्यामुळे मी त्याचा सर्वे क्र.१३०/४ असल्याचे नाकारत आहे.

**१८**. मी प्रतिवादींनी दाखल केलेल्या कागदपत्रांची माझ्या वकिलांकडून माहिती घेतलेली नाही. मला सदर कागदपत्रांची माहिती घेण्यास कोणतीही अडचण नव्हती. मला सर्वे क्र.१३० मध्ये २२ हिस्से पडल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी देखील दावा मिळकत प्रतिवादींच्या वडिलांच्या ताब्यात असल्यामुळे त्यांची वहिवाटदार म्हणून नोंद होती. आम्ही सर्वे क्र.१३० च्या पोटहिस्या बाबत तक्रारी केल्या असून मला त्या कधी व केव्हा केल्या याबाबत माहिती नाही. मला त्यांचे क्रमांक व त्या कोणासमोर दाखल केल्या होत्या याबाबत सांगता येणार नाही. मला त्या तक्रारींचे कधी व काय

निकाल झाले याबाबत सांगता येत नाही. माझे पती हालचाल करु शकत नसल्यामुळे मी त्याची कागदपत्रे दाखल करु शकत नाही.

**१९**. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने पुर्वी दाखल केलेल्या दाव्याच्या अगोदर पासून प्रतिवादींच्या वडिलांचे नाव दावा मिळकतीच्या पिक–पाहणी उता–याला होते. त्याबाबतच्या तक्रारी महसूल विभागाकडे चालू होत्या. महसूल विभागाने एक वर्षासाठी प्रतिवादीच्या वडिलांचे खोटे नाव दाखल केले होते. मला ते प्रकरण आयुक्तां पर्यंत चालल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी आमचा व प्रतिवादींचा महसूल कार्यालयाकडे कोणताही वाद प्रलंबित नाही. मला आमच्यात व प्रतिवादींच्यात महसूल विभागाकडे कोणते काम प्रलंबित आहे याबाबत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणीवपूर्वक महसूल विभागाकडे प्रकरण प्रलंबित असल्याचे खोटे सांगत आहे.

**२०**. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींच्या दोन खोपी व एक गोठा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही प्रतिवादींच्या ताब्यातील दावा मिळकत मिळण्यासाठी सरकार कडे मागणी केलेली नाही. मला सदर प्रकरण कोणत्या वर्षी व तारखेला दाखल केले ते आता आठवत नाही. मी पुढील तारखे पर्यंत त्याची कागदपत्रे दाखल करु शकते. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत पुर्वीपासून सरकारी पडीची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत मिळाल्यापासून प्रतिवादी मालकी हक्काने वहिवाटत आहे.

**२१**. आम्ही प्रतिवादींच्या वैयक्तिक जमिनी बाबत तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, संतूच्या मृत्यूनंतर त्याने बांधलेल्या खोपी व जनावरांचा गोठा प्रतिवादींच्या ताब्यात आहे.

**प्रश्न** – प्रतिवादींनी खोपी काढून जनावरांसाठी पक्का गोठा बांधण्यास सुरुवात केली आहे ?

**उत्तर** – दावा मिळकतीत खोपी नसून प्रतिवादींनी दांडगाईने कामास सुरुवात केली आहे.

२२. आम्ही दावा दाखल करण्यापूर्वी प्रतिवादींनी रातोरात बांधकाम पुर्ण केले होते. आम्ही दाखल केलेला मनाईचा अर्ज व त्यावरील अपिल न्यायालयाने नाकारले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी हे दावा मिळकत पुर्वीपासून त्यांच्या वहिवाटीत असल्याचे सांगत आहेत. आम्हाला दावा मिळकत सोडून दुसरी सरकारी जमीन मिळालेली असून मला त्या जमिनीचा क्रमांक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, ती जमीन लांब अंतरावरती आहे. ती जमीन आम्हाला गाव सोडून खाली मिळालेली आहे. दावा मिळकत गावालगत असून तिच्यालगत प्रतिवादींची जमीन आहे.

२३. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी हे त्यांच्या मिळकतीसह दावा मिळकत स्वतःची असल्यामुळे वहिवाटत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दावा मिळकत देण्यात आलेली नसून देखील त्याबाबतची खोटी महसूल नोंद घेतली आहे. आमच्याकडे दावा मिळकतीची सरकारकडे रक्कम भरल्याचा कागदोपत्री पुरावा नाही. आमच्याकडे दावा मिळकतीचा ताबा दिल्या बाबतची कब्जेपावती नाही. साक्षीदार स्वतःहून सांगते, ती पावती मिळाल्यास दाखल करु शकते. मला दावा मिळकत आम्हाला कोणत्या वर्षीच्या कब्जेपावतीने दिली याबाबत सांगता येणार नाही.

२४. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीशी आमचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींकडून दावा मिळकत मिळवण्यासाठी आम्ही खोटा दावा दाखल करुन ताब्याची मागणी केली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १७.०३.२०२५.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.